# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत

**(१) २८४५८ (२१-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वर्षाला सुमारे ३० हजार रुग्ण तपासले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्ण संख्या लक्षात घेता सदर आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-१०-२०१६) :** (१)हे खरे आहे
(२) हे खरे आहे
(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करयात येत असून आंबलोली येथे नवीन ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी जोडबृहत आराखडामध्ये निकषानुसार प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कामथे (जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(२) २९४७४ (१६-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), सदानंद नारायण चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामथे (जि.रत्नागिरी) उपजिल्हा रुग्णालयात सुविधांचा अभाव असल्यानने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाच्या कारभार सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही

(२) या रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक हे स्त्रीरोग तज्ञ आहेत, तसेच या ठिकाणी बालरोग तज्ञ व आस्थिरोग तज्ञ उपलब्ध आहेत. एनएचएम अंतर्गत सर्जन, भिषक व भुलतज्ञ उपलब्ध करुन दिलेले आहेत, रुग्णालयात टेलिमेडीसीन सेंटर, ब्लड स्टोअरेज युनिट,क्ष-किरण प्रयोगशाळा तपासणी, दंत तपासणी, आयसीटीसी अंतर्गत गरोदर मांताचे समुपदेशन करण्यात येते. शिवाय कुंटूब कल्याण शस्त्रक्रिया शिबीरे इत्यादी सेवा व सुविधा चालू आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामक (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांबाबत**

**(३) ४६९९१ (११-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे)** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामक (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून तेथे केवळ एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्यामुळे तेथे येणाऱ्या रुग्णांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तातडीने भरुन रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र धामक येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची सर्व पदे भरलेली आहेत. फक्त आरोग्य सहाय्यक (महिला) हे १ पद रिक्त आहे. सदर पद पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ८४८१३ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या ६७ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३७८ उपकेंद्रे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी गट-अ ची किती पदे भरण्यात आली आहेत व किती पदे अद्यापही रिक्त आहेत, तसेच भरण्यात आलेल्या पदांपैकी किती वैद्यकीय अधिकारी अद्याप हजर झाले नाहीत,

(३) असल्यास, रिक्त असलेली पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहेत व मंजूर पदांपैकी भरण्यात आलेल्या पदांवरील न कळविता सेवेत हजर न होणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०८-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) रत्नागिरी जिल्हयात एकुण ६७ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३७८ उपकेंद्र कार्यान्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी गट-अ, वैद्यकीय अधिकारी यांची १३१ पदे मंजूर असून त्यापैकी ८० पदे भरलेली आहेत व ५१ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ च्या भरलेल्या ८० पदांपैकी १४ वैद्यकीय अधिकारी अनधिकृतरित्या गैरहजर आहेत.

(३) दिनांक ०८.०९.२०१७ रोजी वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाच्या ३९४ रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच दिनांक ०४.१२.२०१७ व दि.०५.१२.२०१७ रोजी समुपदेशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन रत्नागिरी जिल्हयासाठी एकुण ३ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली त्यापैकी दोन वैद्यकीय अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले आहेत.

जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकडून सेवेत हजर न होणा-या वैद्यकीय अधिका-यांना हजर होणेबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे. परंतु अद्यापही सेवेत हजर न झाल्याने त्यांची सेवा समाप्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या जिल्हा रुग्णालयात समुपदेशक व मनोविकार तज्ञांच्या माध्यमातून उपचार व मार्गदर्शन करण्याची योजना आखण्याबाबत**

**(५) ८८९६३ (१९-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मनोरुग्णांची संख्या वेगाने वाढत असून जागतिक आरोग्य संघटनेनेही यंदाचे वर्ष 'डिप्रेशन लेट्स टॉक' म्हणून साजरे करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत 'चला बोलू या, नैराश्य टाळू या' या संकल्पनेवर तरुणाई व वृध्दामधील नैराश्यावर उपाय करणाऱ्या व्यापक योजनेचे उद्घाटन दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी जिल्हा रुग्णालयात समुपदेशक व मनोविकार तज्ज्ञांच्या माध्यमातून उपचार व मार्गदर्शन करण्याची योजना आखण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानसिक आरोग्याची तपासणी करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात तसेच ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी या चारही मनोरुग्णालयामध्ये पुरेसे मनोविकार तज्ञ व समुपदेशक यांची उपलब्धता नसल्यामुळे मेंटल हेल्थ ॲक्टचे उल्लंघन होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या अडीच वर्षात नऊ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये म्हणून त्यांचे समुपदेशन करण्याची योजना शासनाने गेल्या वर्षी सुरू केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यासाठी १४ जिल्ह्यात, जिल्हा रुग्णालयामध्ये प्रत्येकी १० खाटा निर्माण करण्यात आल्या असल्या तरी त्यासाठी पुरेसे डॉक्टर, समुदेशक अशा प्रशिक्षित परिचारिका यांची नियुक्ती न करण्यात आल्यामुळे समुपदेशनाचे काम मंदावले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार पुरेसे डॉक्टर व प्रशिक्षित परिचारिकांची नियुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे

(५) हे खरे नाही.

(६) मराठवाडा व विदर्भातील ९ जिल्हे व जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमातील ५ जिल्हे असे एकूण १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयामध्ये शेतक-यांना शाश्वत आरोग्य सेवा व समुपदेशन सेवा देण्यासाठी शासनाने ऑक्टोबर २०१५ पासून "प्रेरणा प्रकल्प शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रम " राबविण्यास सुरुवात केली आहे.

आत्महत्या ग्रस्त भागात शेतक-यांचे समुपदेशन करण्याकरीता एकूण १८८ मानसोपचार तज्ञांची पदे मंजूर असून त्यापैकी १०८ पदे भरण्यात आली आहे. उर्वरीत २० रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नुकत्याच मुलाखती घेण्यात आल्या असून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकल्पासाठी प्रत्येक जिल्हा रुग्णालयात ५ महिला व ५ पुरुषांसाठी खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. याठिकाणी मनोविकार तज्ञ, समुपदेशक यांच्यामार्फत बाहयरुग्ण व आंतररुग्णांना समुपदेशानाच्या सेवा व आरोग्य कर्मचा-यांमार्फत विविध स्तरावर मानसिक आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

प्रेरणा प्रकल्पा अंतर्गत साधारणत: १००० लोकसंख्येमागे १ आशा कार्यकर्ती गाव पातळीवर कार्यरत असून त्याव्दारे सर्व्हेक्षण करण्यात येऊन संभावित जोखमीचे कुटूंब ओळखून त्यांचे समुपदेशन करण्यात येते. सन २०१५ ते मार्च २०१८ अखेर ९२,३५४ व्यक्तीनां समुपदेश करण्यात आले आहे.

---

## मुंबई उपनगर जिल्हयातील वनसदृश्य जमिनी ओळखण्याकरीता (Identify) स्थापन केलेल्या समितीच्या शिफारसीची अमलबजावणी करण्याबाबत

**(६) ९६१९७ (२६-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हयातील वनसदृश्य जमिनी ओळखण्याकरीता (Identify) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली व जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा याची समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यात कोणत्या शिफारशी आहेत,

(३) असल्यास, शिफारसीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २०२/९५ श्री.टी.एन.गोदावरमन धिरुमलपड विरुद्ध केंद्रशासन व इतर या प्रकरणी दिनांक १२.१२.१९९६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्हयातील वनसदृश्य जमिनी Identify करण्याकरिता जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षेतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती.

(२), (३) व (४) सदर समितीने दिनांक २९.७.१९९७ रोजी अहवाल सादर केला होता. त्यामध्ये मुंबई उपनगरातील कांदळवन क्षेत्र १४५८.०० हे.आर व शासकीय क्षेत्र ७६.०० हे.आर असे एकूण १५३४.०० हे.आर वनसदृश्य असल्याची शिफारस केली. राज्यातील वनसदृश्य क्षेत्राच्या यादीत सदर क्षेत्र अंतर्भूत करुन दिनांक २०.८.१९९७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञा पत्र सादर करण्यात आले.

तद्नंतर वनसदृश्य क्षेत्राचे पुनर्विलोकन करताना सदर समितीने दिनांक १६.१०.२००६ च्या अहवालात कांदळवन क्षेत्र ६१०६.५९ हे.आर व शासकीय क्षेत्र ७६.०० हे.आर असे एकूण ६१८२.५९ हे.आर क्षेत्र वनसदृश्य असल्याची शिफारस केली व त्यानुषंगाने दिनांक २.६.२००८ रोजी सुधारित प्रतिज्ञापत्र मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सुधारित प्रतिज्ञापत्रावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून निर्देश होणेस्तव मा.सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या वतीने दिनांक २८.२.२०११ रोजी इंटरलॉक्यूटरी ॲप्लीकेशन दाखल केलेला आहे.

राज्यातील वनसदृश्य क्षेत्राच्या परिरक्षणाच्या दृष्टीने शासनाने दिनांक १६.१२.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये संबंधितांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

---

**राज्यात वन्यप्राण्यांचा उपद्रवामुळे पिकांचे होत असलेले नुकसान**

**(७) ९६२०४ (२६-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्यप्राण्यांचा उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या धान, गहु, हळद, आदी महत्वाच्या पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्या पासून होणारे नूकसाना संदर्भात कायमचा बंदोबस्त व्हावा याकरीता गावातील शेतकऱ्यांनी वन अधिकाऱ्यांकडे बरेचदा अर्ज करून सुध्दा त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्यप्राण्याच्या उपद्रवामुळे शेतावर काम करण्यास जाणाऱ्या शेतमजूरांच्या जीवाला सुध्दा धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वन्याप्राण्याचा उपद्रवामुळे शेतातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतमालकांना वनविभागाकडुन नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१८) :** (१) राज्यात वनालगत असलेल्या क्षेत्रामध्ये वन्यप्राणी शेतपिकांचे नुकसान करतात हे खरे आहे.

(२) शेतपिकांचे नुकसान करणाऱ्या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत शेतकऱ्यांमार्फत मागण्या वारंवार होत असतात. वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

• शेतपिकाचे नुकसान झाल्यास अर्थसहाय्य तर्त्पतेन देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २८.०९.२०१५ अन्वये आर्थिक सहाय्यची रक्कम अदा करण्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

• पिक व फळ झाडांचे नुकसान तात्काळ अदा करण्याकरिता सदर विषय राज्य सेवा हक्क कायद्यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

• शासनामार्फत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यारिता BDS मध्ये (-) उणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

• शेतकऱ्यांकडुन मागणी केल्याप्रमाणे वनालगत शेतकऱ्यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजना, जिल्हा योजना, इको-डेवलपमेंट योजना, ट्रायबल योजना, टायगर फांऊडेशन इत्यादी योजनेतुन सौर कुंपण / तारेचे कुंपणासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

• स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते.

• वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर येवू नये म्हणून वनक्षेत्रात त्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव / खोदतळे / कृत्रिम पणवठे (सिमेंट टाके) तयार करण्यात आले आहेत.
• शेतपिकाचे नुकसान करणारे निलगाय व रानडुक्कर या वन्यप्राण्यांना पारध करण्याच्या अटींचे सुलभीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार या वन्यप्राण्यांना पारध करण्यासाठी तात्काळ कार्यवाही व्हावी म्हणून परवाने जारी करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी यांना प्रदान करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

तृणभक्षी वन्यप्राणी शेतपिकाचे नुकसान करतात. मात्र त्यांचेमुळे शेतमजुरांचे जिवाला धोका पोहचत नाही. तथापि वनक्षेत्रालगत असलेल्या शेतात मांसभक्षी प्राण्यांचा वावर होत असल्याने त्यांच्याकडून मानवावर हल्ले होण्याची शक्यता नाकाराता येत नाही.
(४) सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या कालावधी वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई म्हणून रु. ३,७६५.५५ लक्ष निधीचे वाटप कण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्वयंसेवी संस्थाकडून नव्याने बालगृह सुरु करण्याबाबत**

**(८) ९७९९४ (२६-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात केंद्र शासनाच्या कायदयाचा आधार घेऊन राज्यात अस्तित्वात असलेल्या बालगृहांच्या नोंदणीच्या कामासोबत स्वयंसेवी संस्थाकडून नव्याने बालगृहे सुरु करण्याचा प्रस्तावही दाखल होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) २०१५, कलम ४१ व केंद्रीय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१६ नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना निवासीसेवा पुरवणाऱ्या संस्थांकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. मात्र नवीन बालगृहांसाठी शासनाने कोणतेही प्रस्ताव स्वयंसेवी संस्थांकडून मागवलेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील वन विभागाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण**

**(९) ९९६०६ (२६-१२-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील वन विभागाच्या अनेक हेक्टर वन जमिनीवर अतिक्रमण झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचे आदेश देण्यात आले असल्याची बाब दिनांक ४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या वन अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे,

नांदेड जिल्ह्यातील मुखेड वनपरिक्षेत्र कार्यालयास दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी मौजे बापशेटवाडी (दामला तांडा) तालुका मुखेड येथे वनजमिनीवर अतिक्रमण होणार असल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

त्यानुषंगाने संबंधित वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी जायमोक्यावर पाहणी केली. त्यामध्ये वनजमिनीवर कोणतेही अतिक्रमण व अतिक्रमणधारक दिसून आले नाही. चौकशीत तक्रारदार यांनी वैयक्तिक वादातून तक्रार केल्याचे समजले व तक्रार चुकीची असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा विभागातील औरंगाबाद व जालना जिल्हयातील वन क्षेत्रावर झालेले अतिक्रमण**

**(१०) १०२१२६ (२६-१२-२०१७). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील औरंगाबाद व जालना जिल्हयातील पाच हजार हे.आर वन क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासकीय वन जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) औरंगाबाद व जालना या दोन जिल्ह्यातील एकूण ४८२४.२९४ हे.आर वनक्षेत्रावर अतिक्रमण असल्याचे आढळून आले आहे.

(२) वनजमिनीवरील अवैध अतिक्रमणे हटविण्याचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यानूसार अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे, एकूण ४८२४.२९४ हे.आर वनक्षेत्रावर झालेल्या अतिक्रणापैकी २५७.०० हे.आर वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे.

(३) वनक्षेत्राच्या हद्दी पडताळण्यासाठी विलंब लागणे, वनहक्काचे दावे अनिर्णित असणे, न्यायालयात प्रकरणे असणे इत्यादी कारणामुळे विलंब होत आहे.

---

**राज्यातील स्वयंसेवी बालगृहांची मान्यता रद्द करण्याच्या आदेशापूर्वीचे थकित भोजन नुदानाबाबत**

**(११) १०६०१२ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१४ स्वयंसेवी बालगृहांची मान्यतेचे आदेश शासनाने रद्द करण्या पूर्वी या संस्थांचे थकित भोजन अनुदान नाकारले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली ४ वर्षे बालकांचे भोजन अनुदान देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने थकित अनुदान या संस्थांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये मान्यता रद्द करण्यात आलेल्या बालगृह संस्थाचे सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या वर्षाचे मुल्यनिर्धारणानुसार देय होणारे अनुदान अदा करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार दिनांक २०१७-१८ या वर्षाचे अनुदान अदा करण्यात आलेले नाही.

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सन २०१०-११ ते २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी राज्यातील स्वंयसेवी संस्थांच्या बालगृहांच्या अनुदानाबाबत, पुनर्मुल्यनिर्धारण अहवालानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.पाडलोस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या गावात वन्य प्राण्यामुळे झालेले नुकसान**

**(१२) १०६४०५ (३१-०३-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पाडलोस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेती, बागायती व पाळीव प्राण्यांवर केलेल्या हल्ल्यांमुळे नुकसान होत असल्याचे निवेदन वन संरक्षक यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाडलोस गावात गव्यांचा व बिबट्याच्या हल्ल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान तसेच पाळीव प्राण्यांवरील हल्ले याचा बंदोबस्त करण्यासाठी कोणती सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आली आहे व नुकसानग्रस्त शेतकरी, बागायतदार व ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत काय निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने सुरक्षात्मक कारवाई व नुकसान भरपाई देण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे पाडलोस गावात सन २०१७-१८ मध्ये वन्यप्राण्यांकडून झालेल्या पिक नुकसानीची ३ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना रु. ७८००/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. पशुधन हानीचे एकही प्रकरण निदर्शनास आलेले नाही.

मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते

• ग्रामीण भागात विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांचे होणारे संभाव्य हल्यापासून योग्य ती खबरदारी घेणेच्या अनुषंगाने जाहीर आवाहनाच्या प्रती ग्रामपंचायत कार्यालय तसेच सार्वजनिक ठिकाणी लावणेत आल्या आहेत.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस, शेतपिक नुकसानी प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास तसेच पशुहान हानी प्रकरणी संबंधित पशधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील वन परिक्षेत्रात साग वृक्षाची झालेली तोड

**(१३) ११०१६५ (३१-०३-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील शेख फरीद (वझरा) येथे २०० वर्षापूर्वीचे वन परिक्षेत्र अधिका-यांसह कर्मचाऱ्यांच्या संगनमताने २०० घनमिटर सागवानची तोड करण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनस्तरावर 'वृक्ष लावा वृक्ष जगवा' ही मोहिम राबविली जात असतांनाही सागवानाची तोड केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) माहूर जि.नांदेड येथील सर्वे क्र.६ (सी) व ६(डी) मधील क्षेत्रात शासकीय साग वृक्षांची तोडीची परवानगी तत्कालीन वृक्ष अधिकारी यांनी नाकारलेली असताना अतिरिक्त कार्यभारात असलेले वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दिनांक १३.१२.२०१७ ला वृक्षतोडीची परवानगी दिल्याने २०२ साग वृक्षांची अवैधरित्या कटाई झाल्याचे आढळले आहे. या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत वनगुन्हे नोदविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल यांना दिनांक २०.१.२०१८ रोजी निलंबीत करण्यात आले आहे. तसेच त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील मलिक अंबर कालीन उदयानाचे सुशोभिकरण करण्याबाबत

**(१४) १११६७५ (१८-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या गुलशन महल या शासकीय निवासस्थानामागील मलिक अंबर कालीन उदयानाची १ कोटी निधीतून कामे करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील १४ एकरपैकी ४ एकर जागेत जैवविविधता उदयान करण्याचा प्रस्तावही मागे पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधीची तरतूद करुन सदर उद्यानाला गतवैभव प्राप्त करुन देण्यासोबतच येथे जैवविविधता उदयान उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०८-२०१८) :** (१), (२) व (३) जिल्हा नियोजन समिती औरंगाबाद यांनी गुलशन महल येथे विशेष सुशोभीकरणाच्या दृष्टीकोनातून विविध प्रजाती व औषध उपयोगी रोपांची लागवड करण्याकरीता उपवन संरक्षक, औरंगाबाद यांना रुपये २१,९२,०००/- इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.एकलहेरा (ता.अंबड, जि.जालना) येथे बिबटयाने केलेला हल्ला**

**(१५) ११२३०६ (३१-०३-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.एकलहेरा (ता.अंबड, जि.जालना) येथे बिबटयाने एका गाईवर हल्ला केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, काही शेतकऱ्यांना हा बिबटया परत अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या उसात शेतात गायब झाल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बिबटयाला वन विभाग प्रशासनाकडून पकडण्यात आले आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) मौजे एकलहेरा, ता. अंबड येथे दिनांक १७.०१.२०१८ रोजी कालवड बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमूखी पडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३)घटनास्थळी मौजे एकलहेरा येथे बिबट या वन्यप्राण्याचा शोध घेतला असता वन्यप्राण्यांच्या अस्पष्ट पाऊलखुणा आढळून आला आहेत. तथापि सदर परिसरात वनकर्मचाऱ्यांनी दिवस-रात्र गस्त केली असता बिबट्या आढळून आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाबळेश्वर (जि.सातारा) मधील लॉडविक पॉइंटवर पर्यटकाच्या चूकीमुळे लागलेली आग**

**(१६) ११४४०१ (०४-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर (जि.सातारा) मधील लॉडविक पॉइंटवर एका पर्यटकाने केलेल्या धुमृपान केल्यानंतर सिगारेटचं थोटूक खाली टाकल्याने आग भडकल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटकाच्या सिगारेटमुळे पेटलेल्या वणव्यामुळे तब्बल पाच किलोमीटरचा परिसर जळून भस्मसात झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितावर कारवाई करण्यासह आगी सारख्या दुर्घटनांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :** (१) हे, खरे आहे.

दिनांक १७.१.२०१८ रोजी अज्ञात इसमाच्या निष्काळजीपणामुळे लॉडविक पॉईंट येथील वनास आग लागण्याची घटना घडली आहे.
(२) सदर घटनेत ३ हे. वनक्षेत्र जळून वनाचे नुकसान झाले आहे. वनकर्मचारी व स्थानिकांच्या मदतीने सदर वणवा विझवल्याने वणवा लवकर आटोक्यात आणता आला.
(३) व (४) सदर प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द वनगुन्हा क्र.३/२०१८ दिनांक १७.१.२०१८ दाखल करण्यात आला असून वनपाल, महाबळेश्वर यांचेमार्फत सदर वनगुन्हयाची चौकशी केली परंतू अद्याप आरोपी मिळून आला नाही.

राखीव वनालगत जाळरेषा घेणे, जनजागृती करणे, वनसंरक्षणात लोकसहभाग घेणे, वणवा विझविण्यासाठी फायर ब्लोअरचा वापर करणे इ. प्रतिबंधक उपाययोजना करण्यात येतात.

---

## सागरेश्वर अभयारण्यात (ता.वाळवा, जि.सांगली) असलेल्या गावात शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांकडून होत असलेले नुकसान

**(१७) ११४४६९ (१९-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सागरेश्वर अभयारण्यात (ता.वाळवा, जि.सांगली) असलेल्या ताकारी, भवानीनगर, रेठरे हरणाक्ष, लबंडमाची इत्यादी गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांकडून मोठया प्रमाणात नुकसान केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्यप्राण्यांकडून होत असलेले शेतकऱ्यांच्या पीकांचे नुकसान टाळण्यासाठी तेथील शेतकऱ्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.वने मंत्री तसेच वन विभाग, सांगली यांच्याकडे गेली दोन वर्षापासून वन हद्दीमध्ये संरक्षक कुंपण घालण्याबाबत लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची लेखी मागणी करुन सुध्दा वन विभाग, सांगली यांच्याकडून कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) ताकारी, भवानीनगर, रेठरे हरणाक्ष, लबंडमाची इत्यादी गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांनी नुकसान केल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.
(२), (३) व (४) सागरेश्वर अभयारण्याच्या हद्दीवरील ज्या ठिकाणी सरंक्षण कुंपण नाही अथवा ना दुरुस्त आहे त्याठिकाणी नवीन संरक्षण कुंपण व कुंपण दुरुस्ती करणेची कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन, सांगली यांनी विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांना कळविले आहे. त्या अनुषंगाने संरक्षण कुंपणाचे अंदापत्रके तयार करुन देणेबाबत उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग पलूस यांना वनक्षेत्रपाल (वन्यजीव), सागरेश्वर यांनी दिनांक २१.०२.२०१८ रोजी कळविले असून त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि आरे कॉलनीतील बफर झोनमधील आदिवासी पाड्याचे आरे कॉलनतील इतर जागेत पुनर्वसन करण्याबाबत

**(१८) ११७२९३ (३०-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरास लागून असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि आरे कॉलनीतील बफर झोनमधील सर्व आदिवासी पाड्याचे आरे कॉलनतील इतर जागेत पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व किती कालावधीत या निर्णयाची अंबलबजावणी होण्याची अपेक्षा आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे यांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने गठीत उच्च स्तरीय सशक्तता समितीच्या दिनांक १६.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन आरे दुग्ध वसाहतकडून संपादीत करण्यात आलेल्या मौजे मरोळ मरोशी येथील जमिनीवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांचे व पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन मौजे मरोळ मरोशी येथील जमिनीवर करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत निविदासंबंधीत कागदपत्रे तयार करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) येथे वनखात्याच्या भरारी पथकाचा कारभार संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(१९) ११७९०६ (३०-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथे पाच तालुक्याचा कार्यभार सांभाळणा-या वनखात्याच्या भरली पथकाचा कारभार संथगतीने सुरु असल्याने तेथे अवैध वृक्षतोड व सागवान वृक्षांची अवैधरित्या चोरी होत असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध वृक्षतोड व सागवान वृक्षोची होत असलेली चोरी रोखण्यासाठी फिरते वनपथक शासनाने नेमले परंतु या पथकाकडुन योग्य ती कार्यवाही होत नाही तसेच कटाई मशीनवर अवैधरित्या साग व इतरही दुर्मिळ मौल्यवान झाडांची कटाई होत असुन त्याकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक १.१.२०१८ ते दिनांक ३१.७.२०१८ या कालावधीमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक, भोकर यांनी एकूण ३८ गुन्हयांची नोंद केली असून त्यामध्ये शासन मापदंडानुसार एकूण २७ नियतक्षेत्र तपासणी केली आहे. सदर नियतक्षेत्र तपासणीत व विविध ठिकाणी टाकण्यात आलेल्या एकूण ११ धाडीत जप्त करण्यात आलेले सागवान व इतर एकूण १३६० नग घ.मी.२१.४६३ आहे. अशा कारवाया वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक, भोकर यांनी केल्या आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील वनक्षेत्रातील वन्यजिवांना पाण्याची सोय करण्याबाबत.**

**(२०) ११७९८० (३०-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात सर्वाधिक वनक्षेत्र असुन त्यामध्ये वन्य प्राणी वाघ, बिबटे, रोही, निलगाव, अस्वल, रानडुक्कर, हरिण, ससे, मोर अशा वन्य प्रजाती आढळून येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील वनक्षेत्रात निर्माण होणा-या पाणीटंचाईमुळे या वन्यजीवांना पाण्यासाठी दूरपर्यंत भटकंती करावी लागत असल्यामूळे दोन रोहींचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू झाल्याचे दिनांक १७ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, मागील सहा वर्षापासून नांदेड जिल्हयात पर्जन्यमान्य कमी होत असल्याने वन खाते वन्यजिवांना किमान पाणी मिळेल एवढेही प्रयत्न वा उपाययोजना करीत नसल्याने वन्यजिवांना प्राण गमवावे लागतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) नांदेड वन विभागांतर्गत असलेल्या तालुक्यांपैकी किनवट तालुक्यात सर्वाधिक वनक्षेत्र असुन सदर क्षेत्रात वाघा व्यतिरीक्त बिबट, रोही, निलगाय, अस्वल, रानड्डुकर, हरिण, ससे, मोर अशा वन्यप्राण्यांच्या प्रजाती आढळून येतात.

(२) व (३) घोटी नियतक्षेत्र येथे दिनांक १६.०३.२०१८ रोजी दोन रोहीचा रेल्वेची धडक लागल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मागील सहा वर्षापासून नांदेड जिल्हयात पर्जन्यमान कमी होत असले तरी किनवट तालुक्यात सरासरी इतका पाऊस पडतो.

किनवट तालुक्यातील वनक्षेत्रात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून ९४ नैसर्गिक पाणवठे असून ९१ कृत्रिम पाणवठ्यांची निर्मीती करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे भातसई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील संरक्षित वनक्षेत्रामधील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(२१) ११८०५३ (३०-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भातसई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील संरक्षित वन सर्व्हे क्र. ९७ गट नंबर ३१३ मधील अतिक्रमण तात्काळ हटविण्याकरिता उपवनसंरक्षक, शहापूर वन विभाग, (जि.ठाणे) यांनी दिनांक २२ मार्च,२०१६ रोजी नोटीस देऊनही अद्याप कारवाई न केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने मंत्री यांना दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त संरक्षित वनक्षेत्रातील अतिक्रमण तत्काळ हटविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०९-२०१८)** : (१) मौजे भातसई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील संरक्षित वन सर्व्हे क्र. ९७ गट नंबर ३१३ मध्ये मालकी सर्व्हे नं. ९६ गट नं. ३१० चे मालक श्री. संजय भिशन गोयल यांनी तारेचे कुंपण टाकले असल्याचे निदर्शनास आले होते.

उप अधिक्षक, भूमि अभिलेख, शहापूर यांच्याकडून दिनांक १६.२.२०१६ अन्वये सदर जमीनीची मोजणी करुन अतिक्रमण काढून घेण्याबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आली होती. सदर अतिक्रमणाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक २३.३.२०१८ रोजी मा.मंत्री (वने) यांच्या कार्यालयात निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) वनपाल, वासिंद यांनी संबंधितांना वनजमीनवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात दिनांक १.३.२०१८ रोजी पुन:श्च नोटीस दिली होती.

त्यानुषंगाने श्री.गोयल यांनी दिनांक १९.३.२०१८ रोजी वनजमिनीवर केलेले कुंपन काढून घेतले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवरेकोरडा, गोरेगांव (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील वन विभागाच्या क्षेत्रात लागलेल्या आगीमूळे झालेले नुकसान**

**(२२) ११८९५२ (३१-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरेकोरडा, गोरेगांव (ता.पारनेर जि.अहमदनगर )येथील वन विभागाच्या क्षेत्रातील गवतास आग लागल्यामुळे वन विभाग क्षेत्रासह २०० एकर खाजगी क्षेत्रावरील गवत जळून नष्ट झाल्याची घटना दिनांक ४ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत शेकडो वन्य जीव मृत पावले असल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आग लागल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, आगीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) : (**१) नाशिक वनवृत्तातील अहमदनगर वनविभागातंर्गत मौजे हिवरेकोरडा-गोरेगांव ता.पारनेर जि. अहमदनगर येथील फॉ.ग.नं.४१९ मध्ये दिनांक २.५.२०१८ रोजी रात्री ९.३० वाजता आग लागल्याची घटना वनाधिकारी व वनकर्मचारी यांना कळताच घटनास्थळी दाखल होऊन आग विझविण्यात आली. सदर घटनेचा वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर घटनेमध्ये सुमारे १६ हेक्टर वनक्षेत्र जळीत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर घटनेमध्ये वनक्षेत्रातील गवत व पालापाचोळा जळीत झालेला असून यात वन्यजीव मृत पावल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) आग खाजगी क्षेत्रामध्ये लागून वनक्षेत्राकडे पसरत आलेली आहे.
(४) व (५) सद्य:स्थितीत आगीमुळे शेतकऱ्यांच्या खाजगी क्षेत्रात झालेल्या नुकसानीस वन विभागाकडून भरपाई देण्याची तरतूद नाही.

---

## राज्यातील अभयारण्यात बुध्द पौर्णिमेच्या चंद्र प्रकाशात वन्य प्राण्यांना पाहण्यासाठी जादा शुल्क आकारण्यात आल्याबाबत

**(२३) ११९१६० (३१-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अभयारण्यात बुध्द पौर्णिमेच्या शीतल चंद्र प्रकाशात वन्य प्राण्यांना पाहण्यासाठी ५०० रुपये ऐवजी दीड हजार रुपये शुल्क आकारण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या शुल्क वाढीमुळे अभयारण्यात बुध्द पौर्णिमेच्या शीतल चंद्र प्रकाशात वन्य प्राण्यांना पाहण्यासाठी वन्यप्रेमीचे प्रमाण कमी दिसून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शुल्कवाढ करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू शुल्कवाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) राज्यात दिनांक ३०.०४.२०१८ रोजी बौध्द पोर्णिमेच्या दिवशी वन्यप्राण्यांच्या संख्येचा अंदाज घेण्यासाठी संरक्षीत क्षेत्रात वन्यप्राणी गणना करण्यात आली आहे. संरक्षित क्षेत्राचे प्रकार, सहभागी होणाऱ्यांची संख्या व सहभागी व्यक्तींना पूरविण्यात आलेले साहित्य, भोजन या आधारावर राज्यातील खालील ३ व्याघ्र प्रकल्प अधिनस्त संरक्षित क्षेत्राव्यतिरीक्त राज्यात इतर कोणत्याही संरक्षित क्षेत्रात वन्यप्राणी प्रगणेत सहभागी होणाऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारण्यात आलेले नाही.
• पेंच व्याघ्र प्रकल्पाचे अधिनस्त संरक्षित क्षेत्रामध्ये स्थानिक विद्यार्थासाठी रु. ५००/- शुल्क आकारण्यात आला होता. तसेच इतर लोकांसाठी ऑनलाईन पध्दतीने बुकींग ठेवून व्याघ्र प्रकल्पासाठी रु. १,७००/- (ज्यामध्ये Coffee Table Book, कॅप, जेवण, पाणी, नास्ता इत्यादीचा समावेश होता.) व अभयारण्य क्षेत्राकरीता रु. १,२००/- (ज्यामध्ये टी शर्ट, जेवण, नास्ता, पिण्याचे पाणी इत्यादीचा समावेश होता.) ऐवढे शुल्क आकारण्यात आले.
• मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे अधिनस्त संरक्षित क्षेत्रामध्ये ऑनलाईन पध्दतीने बुकींग ठेवून रु. १,५००/- शुल्क (ज्यामध्ये Coffee Table Book, कॅप, जेवण, पाणी, नास्ता इत्यादीचा समावेश होता) आकारण्यात आले.
• सहयाद्री व्याघ्र प्रकल्पामये रु. १,०००/- शुल्क आकारण्यात आलेले होते.
(२) हे खरे नाही.
(३) विविध भागातून येणाऱ्या प्रगणनकांना व्याघ्र प्रकल्पाचे ज्ञान व्हावे म्हणून प्रगणेत सहभागी होणारे लोकांना कॉफी टेबल बुक, जेवण, पाण्याचे कॅन, माहिती पुस्तिका व टोपी ई. साहित्य देण्यात आल्यामुळे शुल्कात वाढ झालेली आहे.

सदर शुल्कादवारे प्राप्त झालेली रक्कम ही व्याघ्र प्रकल्पाचे संवर्धन प्रतिष्ठान मार्फत हाताळली जाते. शुल्का मधून वन्यप्राणी प्रगणेत सहभागी होणाऱ्यांना पुस्तक, साहित्य व भोजन उपलब्ध करुन दिले जाते, सदरची रक्कम शासन खजिन्यात राजस्व म्हणून जात नसल्याने सदर शुल्क कमी करण्याचे प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोणगांव (जि.बुलढाणा) परिसरात होणारी अवैध वृक्षतोड**

**(२४) ११९३४४ (३०-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगांव (जि.बुलढाणा) परिसरात अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, ,

(३)असल्यास, त्यानुसार डोणगांव परिसरातील अवैध वृक्षतोड रोखण्यासह यास जबाबदार असणा-या संबधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बुलढाणा वन विभागातील डोणगाव ता.मेहकर, जि.बुलढाणा हे गाव घाटबोरी वनपरिक्षेत्रातील इसवी वर्तुळ वाडी नियतक्षेत्रात समाविष्ट आहे. मे २०१८ मध्ये वाडी नियतक्षेत्रात अवैध वृक्षतोडीचे २ प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले नाही .

(२) दिनांक २५.५.२०१८ रोजी वनगुन्हा नोंदविला असून ३ साग वृक्षांची अवैध वृक्षतोड आढळली आहे. थुटावरील एकूण ६ नग, ०.१६१ घ.मी. लाकूड जप्त केले आहे. तसेच वनगुन्हा दिनांक २७.५.२०१८ नुसार ३ साग वृक्षांची अवैध वृक्षतोड आढळली असून थुटावरील एकूण ६ नग, ०.१९८ घ.मी. जप्त करुन लिलावा करीता लाकूड आगार देऊळगाव साकर्शा येथे वाहतुक केली आहे.

(३) व (४) क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्याकरिता नियमित गस्त करण्याचे निर्देश दिले आहेत.

---

**सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहारातील चंदनाच्या झाडांची अवैधरित्या तोड केल्याबाबत**

**(२५) ११९६६१ (३१-०७-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहारातील पूर्ण वाढ न झालेल्या १५ ते२० चंदनाच्या वृक्षाची अवैधरित्या तोड केल्याची घटना दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या बाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :** (१) सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहारातील १२ अपरिपक्व ४० ते ५० से.मी. वेढीची चंदन झाडांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) वनरक्षक सिध्देश्वर यांनी दिनांक ६.५.२०१८ अन्वये प्रथम वनगुन्हा नोंदविला असून सदर प्रकरणाची चौकशी वन अधिकाऱ्यामार्फत सुरु आहे.
(३), (४) व (५) सदर वनगुन्हा नोंदविला असून तपास वनविभागामार्फत सुरु आहे.

---

**भीमाशंकर (ता.खेड, जि.पुणे) अभयारण्यातील वेल्होळी गावात दोन भेकरांचा झालेला मृत्यू.**

**(२६) १२०१५४ (३१-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भीमाशंकर (ता.खेड, जि.पुणे) अभयारण्यातील वेल्होळी गावात पाण्याच्या शोधात विहिरीत पडून दोन भेकरांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ०६ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभयारण्यातील प्राणी सुरक्षित राहावेत म्हणून वन विभागामार्फत जाळीचे कुंपण (कम्पाउंड) बांधणे, पाणी साठ्यासाठी नवीन तळी बांधणे, वन्य प्राण्यांना निवारा तयार करणे यासाठी निधी खर्च करूनही पाणी उपलब्ध नसल्याने वन्य प्राण्यांचा मृत्यू होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, अभयारण्यातील प्राणी सुरक्षित रहावे म्हणून वन विभागाकडून मंजूर केलेला निधी खर्च होऊनसुध्दा वन्य प्राणी पाण्याविना मृत्यू पावतात यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्याच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) दिनांक ०६.०५.२०१८ रोजी वेल्होळी गावामध्ये श्री. प्रकाश मारुती डोळस यांचे मालकीच्या ३ फुट उंचीचे दगडी कठडे असलेल्या विहरीत पडून २ भेकरांचा मृत्यू झाला आहे.
(२) व (३) उपरोक्त घटनास्थाळापासून ३०० मीटर अंतरावरील ओढ्यात, जवळच कार्वीचा दरा हे पानस्थळ असून त्यामध्ये उन्हाळ्यामध्ये व वेहळोली गावाजवळील ४ पैकी ३ पानस्थाळामध्ये पुरसे पाणी उपलब्ध होते त्यामुळे केवळ पाण्याच्या शोधात सदर दोन भेकरांचा मृत्यु विहिरीत पडून झाल्याचे म्हणणे योग्य नाही.

भिमाशंकर अभयरण्य क्षेत्रात १६ नैसर्गिक व २७ कृत्रिम असे एकूण ४३ पानस्थळ आहेत. तसेच मागील ३ वर्षांमध्ये १९२ जाळीबंधारे, १८७ चेक डॅम व दोन कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहे.

सन २०१७-१८ मध्ये १३ कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहेत.

भिमाशंकर अभयारण्यातील वेहळोली गावांतील ३ विहीरीना डॉ.शामाप्रसाद मुखर्जी योजनेअंतर्गत कुंपण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिहयात वृक्षलागवडीसाठी निधी खर्च करुनही एकही वृक्ष जिवित न राहिल्याबाबत**

**(२७) १२०२६१ (३१-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील काही वर्षातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी व पर्यावरणाची जोपासना करण्याकरीता वृक्षलागवडीकडे शासनाचे अधिक लक्ष असतानासुध्दा नांदेड जिल्हयात वृक्षलागवडीसाठी मागील काही वर्षात मंजूर निधीपैकी लाखो रुपये खर्च करुनही जिल्हयात एक ही वृक्ष जिवित नसल्याची बाब माहे एप्रिल-मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नांदेड जिल्हयात वृक्षलागवडीसाठी लाखो रुपये खर्च करुनही वृक्षांची निगा न राखणा-या संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शासनाने सन २०१६ च्या पावसाळयात २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हयात वन विभाग, सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळ, ग्राम पंचायत, इतर प्रशासकीय विभाग व लोकसहभागातून एकूण ६,६२,१५६ इतकी रोपे लागवड करण्यात आली आहे. त्यापैकी माहे मे २०१८ अखेर ३,७९,२७२ एवढी ( ५७.२८% ) रोपे जिवंत आहेत.

५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वर नमूद केलेल्या यंत्रंणांमार्फत सन २०१७ च्या पावसाळयात नांदेड जिल्हयात १७,८६,८३४ रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी इतर यंत्रणांनी लावलेली रोपे वगळून माहे मे-२०१८ अखेर जिवंत रोपांची संख्या १२,४३,५९५ एवढी (६९.६०%) आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा अजनी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील साठवण तलावाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत**

**(२८) १२०३२७ (२३-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा अजनी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील साठवण तलावाचे काम सन २०१६ पासून बंद असून या अपूर्ण कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास संबंधीत विभागाला लेखी निवेदन देऊन निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील मुख्य नदीवरील अजनी-दहिगाव या रस्त्यावरील पूलाचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौ.अजनी येथील साठवण तलावाचे व अजनी-दहिगाव या रस्त्यावरील पूलाचे प्रलंबित काम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०९-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) धरणाचे सांडव्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. तसेच पुलाच्या बांधकामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. या योजनेची सुधारीत अंदाजपत्रकानुसार किंमत रु.२५.०० कोटी पेक्षा अधिक असल्याने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) कडून मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरखेडा (जि.बुलढाणा) तालुक्यातील वन्य प्राण्याच्या पाण्याची सोय करण्याबाबत**

**(२९) १२१०७६ (३०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेडा (जि.बुलढाणा) तालुक्यातील वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती सुरु असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मे महिन्यात उन्हाची दाहकता लक्षात घेता वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्याकरीता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर वनपरिक्षेत्रातीत बीबी बिटामधील साखरखेडा गावा लगत कोणतेही वनक्षेत्र नाही. तसेच माहे मे, २०१८ वा

त्यादरम्यान पिण्याच्या पाण्याकरीता वन्यप्राणी भटकंती करीत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) व (३) सद्य:स्थितीमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांना उन्हाळ्यात पीण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून आवश्यक तेथे पानवठ्याची निर्मिती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रक पथक कार्यालयातील कर्मचा-यांना वेतन मिळाले नसल्याबाबत.**

**(३०) १२११७१ (३१-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने माहे मार्च २०१८ मध्ये लघुसिंचन विभागाचे नाव बदलून मृद व जलसंधारण कार्यालयाचे प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रक पथक असे नामांतर केल्यामुळे जलसंधारण विभागाच्या अखत्यारीत काम करणा-या कर्मचा-यांची व अधिका-यांची सेवा तेथे वर्ग करण्यात आली परंतु असे करतांना या कर्मचारी व अधिका-यांची वेतनाची कोणतीही तरतूद शासनाने केली नसल्यामूळे या विभागातील कर्मचा-यांना तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित कर्मचा-यांना वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन २०१८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मृद व जलसंधारण विभागासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात येऊन विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये वेतनासाठीही पुरेशी तरतुद करण्यात आली आहे. तथापि योग्य त्या सूचना देवूनही काही कार्यालयांनी बदलण्यात आलेल्या लेखाशीर्षानुसार आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक मिळवून त्याप्रमाणे सेवार्थ प्रणालीमध्ये बदलेल्या कार्यालयाच्या नावाच्या नोंदी व पदनामांच्या नोंदी करुन न घेतल्याने त्यांचे वेतन अदा करण्यास अडचण निर्माण झाली होती. तथापि आता सर्व कार्यालयांनी संचालक लेखा व कोषागारे यांचेकडून आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक मिळवून बदलेली कार्यालयाची नावे व पदनामे सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ठ केल्याने आता मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही संबंधीत कार्यालय प्रमुखांनी पूर्ण केली आहे.

---

**आळते (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डोंगरावर होत असलेली अवैध वृक्षतोड**

**(३१) १२१२१८ (३०-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळते (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डोंगरावर अवैध वृक्षतोड होत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, आळते येथील अवैध वृक्षतोड रोखण्यासह यास जबाबदार असणा-या संबधित दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसलयास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर वनविभागातील करवीर वनपरिक्षेत्रातील मौजे आळते (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डोंगरावर माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अवैध वृक्षतोडीची घटना निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी दोडामार्ग कॉरिडॉरमध्ये होत असलेली अवैद्य वृक्षतोड**

**(३२) १२१२२४ (०१-०८-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिधुदुर्ग जिल्हयातील कांही भागात मा.उच्च न्यायालयाने तसेच जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी वृक्ष तोड बंदी घातली असतना सन २०१७-१८ मध्ये मौजे फणसवडे येथे खाजगी व वन विभागाच्या क्षेत्रात वृक्षतोड केली,श्री संदिप गावडे व इतर यांनी सर्व्हे नंबर ९,१२,१६,२३ व ३४ या सर्व्हे नंबरमध्ये वृक्षतोड केली असल्याबाबत कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री अनुपम कांबळी यांनी तक्रार केली आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच आवाज फाउंडेशन, मुंबई यांनी दाखल केलेल्या मा.मुंबई हायकोर्टात दाखल केलेल्या जनहित याचिका १७९/२०१२ (जुना ४०९५/२०११) मधील एप्रिल २०१२ च्या निर्णयानुसार सावंतवाडी दोडामार्ग कॉरिडॉर मधील २५ गावांमध्ये वृक्षतोडीला बंदी घातलेली आहे असे असतानाही सदर २५ गावामधील वृक्षतोडीबाबत सावंतवाडी वनविभागाकडून सौम्यधोरण राबविले जात असून श्री.जयंत बरेगार यांनी अवमान याचिका दाखल होण्याच्या दृष्टीने दि.१५ मे २०१८ रोजी मा.वनमंत्री, सचिव महसूल व वनविभाग (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक (नागपूर, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय  व त्यानुसार सदर ठिकाणी वृक्षतोड करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०९-२०१८) : (**१) मौ.फणसवडे येथे सर्वे क्र. ९,१२,१६,२३ व ३४ मध्ये कोणत्याही प्रकारची वृक्षतोड निदर्शनास आलेली नाही. तथापि, सर्वे क्र.११, १७, २० व ६० या क्षेत्रातील काही भागात वृक्षतोड झालेली आहे. चौकशीमध्ये सदरची तोड ग्रामस्थांनी केली असून श्री.संदिप गावडे यांनी तोड केल्याचे कोणतेही पुरावे सकृतदर्शनी समोर आलेले नाहीत.
(२) व (३) बंदी असलेल्या २५ गावांतील वृक्षतोडीबाबत वनविभागामार्फत कायद्यातंर्गत उचित कार्यवाही तातडीने केली जाते. श्री.जयंत बरेगार यांनी अवमान याचिका दाखल करण्याच्या दृष्टीने दिनांक १५.५.२०१८ रोजी अर्ज केलेला नसून तो अर्ज दिनांक १४.५.२०१८ रोजी दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काही गावात होत असलेली वृक्षतोड**

**(३३) १२१३१३ (३१-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काही गावात अवैधरीत्या वृक्ष तोडून त्याचे लाकूड वखारी व औद्योगिक कारखान्यामध्ये जळणासाठी वापरले जात असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ,शासनाच्या शतकोटी योजना व विविध योजनांतर्गत वृक्षलागवड करण्यात आलेल्या जागी आजही केवळ खडडे दिसत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने  कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
कोल्हापूर वनविभागामार्फत सन २०१६ मध्ये ६.४४ लक्ष रोपे लावण्यात आली होती. त्यापैकी जिवंत रोपे ५.५८ लक्ष असून जिवंत रोपांची टक्केवारी ८६.६६ % इतकी आहे.
सन २०१७ मध्ये ४.५१ लक्ष रोपे लावण्यात आली होती. त्यापैकी जिवंत रोपे ४.३५ लक्ष असून त्याची टक्केवारी ९६.३७ % इतकी आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिंदाळवाडी (तांडा) (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलाव कामास मंजुरी देण्याबाबत**

**(३४) १२१३६९ (२३-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदाळवाडी (तांडा) (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलाव कामाच्या मंजुरीसाठी मा.जलसंधारण मंत्री यांच्या निदेशानुसार व लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० नोव्हेबर,२०१७ रोजी दिलेल्या निवेदनानुसार उपविभागीय अधिकारी, मृद व जलसंधारण, उपविभाग औसा यांनी सदरचे अंदाजपत्रक व नकाशे मान्यतेसाठी दि.१२ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांच्याकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त निवेदनानुसार सदर कामास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-१०-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) प्रस्तावित पाझर तलावाच्या प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची किंमत रु.२८१.०९ लक्ष एवढी असल्याने प्रचलित आर्थिक मापदंडात बसत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत बांधण्यात आलेले बंधारे फोडल्याबाबत**

**(३५) १२१४४८ (३१-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानवड, नांदूर्डी, उगाव आणि खेडे (ता.निफाड, जि.नाशिक) येथे पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत बांधण्यात आलेले बंधारे पालखेड पाटबंधारे उपविभागातील अधिका-यांनी फोडल्याची गंभीर बाब माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबिधतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयामध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत असलेली प्रलंबित कामे**

**(३६) १२१५७५ (२३-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयामध्ये जलयुक्त शिवार योजने अंतर्गत करण्यात येणा-या कामासाठी कोटयावधी रुपये खर्च करण्यात येऊनही अद्याप पर्यत सुमारे ८६६ गावे जलयुक्त होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ८६६ गावात जलयुक्त शिवाराचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ अंतर्गत निवडलेल्या गावात दि.१०/८/२०१८ अखेर १५१८ गावापैकी १४७८ गावे १०० %, ४० गावे ८० % जलपरिपूर्ण झालेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वनविभाग, सामाजिक वनीकरण, वन्यजीव विभाग यांच्या दप्तरी नामंजूर प्रमाणकांची वसुली प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) १२१६२० (३०-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**(१)** राज्यात ५१ वनविभाग, ३४सामाजिक वनीकरण, १८ वन्यजीव विभाग यांच्या दप्तरी कोटयावधी रुपयांची कायमस्वरुपी नामंजूर प्रमाणकांची वसुली प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरमयान निदर्शनास आले , हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, वनविभागात नामंजूर आणि कायमस्वरुपी अशा दोन्ही प्रकारच्या प्रमाणकांत मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे कोटयावधी रुपयांच्या निधीची वसुली प्रलंबित असून भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या अहवालात ही रक्कम वसूल करण्याची बाब निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याकडे वन विभागाच्या अधिका-यांनी केलेल्या दुर्लक्षपणामुळे निधीची गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात ५१ वनविभाग, ३४ सामाजिक वनीकरण, १८ वन्यजीव विभाग यांच्या दप्तरी कोट्यावधी रुपयांची कायमस्वरुपी नामंजूर प्रमाणकांची वसुली प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली नसून, वेळोवेळी लेखापरिक्षणात निदर्शनास आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वन विभागात अंदाजे रु.१.६४ कोटी रक्कमेचे तात्पुरत्या स्वरुपात नामंजूर प्रमाणके व अंदाजे रु.१.३४ कोटी रक्कमेचे कायमस्वरुपी नामंजूर प्रमाणके असे एकूण अंदाजे रु.२.९८ कोटी रक्कमेचे प्रमाणके नामंजूर आहेत. त्यापैंकी रु.३९,२७,१८९ इतकी रक्कम संबंधिताकडून आतापर्यंत वसुल करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

ज्या प्रकरणात निधीचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आले किंवा खोटे प्रमाणके तयार केल्याचे निदर्शनास आले त्या प्रकरणात संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात येते. काही प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. ज्या ठिकाणी मापदंडानूसार कामे झालेली नाहीत असे चौकशी अंती आढळून आले आहे तसेच अतिरीक्त किंवा नियमबाह्य खर्च झाला आहे, अशा प्रकरणात प्रमाणके कायमस्वरुपी नामंजूर करण्यात येवून संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून नामंजूर प्रमाणकांची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(६) नामंजूर प्रमाणकासंदर्भात निर्णय घेण्याच्या प्रकियेत अंतर्भुत असलेली चौकशी/पडताळणी करणे व अनुषंगीक बाब इत्यादी मध्ये लागणारा वेळ विचारात घेता विलंब झालेला नाही.

---

## ढवळापूर (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथे वाघाच्या अवशेष प्रकरणी अटक करण्यात आलेल्या पैकी एका व्यक्तीचा झालेला मृत्यू

**(३८) १२१७४४ (३०-०७-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढवळापूर (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथे वाघाच्या अवशेष प्रकरणी वन विभागाकडून अटक करुन मृत पावलेले श्री.महादेव चैतराम उईके यांनी वाघाची शिकार केली असल्याचा दावा वनविभागाच्या अधिका-यांनी केलेला असून या प्रकरणी १७ जणांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महादेव उईके यांचा मृत्यू झाला असून त्यांचे मृत्यूचे कारण काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणास जबाबदार असलेल्या वन अधिका-यावर कारवाई करण्याबाबत व मृत व्यक्तीच्या कुटुंबास शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१), (२) व (३) पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत वाघाचे अवशेष मिळाल्यासंबंधात वनगुन्ह्य क्रमांक ६७/१, दिनांक २६.०६.२०१७ नोंदविण्यात आला असून प्रस्तूत प्रकरणी एकुण १७ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यामध्ये महादेव चैतराम उईके यांचा समावेश होता. दिनांक १८.०८.२०१७ रोजी ते पहाटे वनकोठडीतुन पळून गेले. तदनंतर दिनांक २६.०८.२०१७ रोजी धवलापुर-नरहर रस्त्यावर त्यांचा मृतदेह पोलिसांना आढळून आला. महादेव चैतराम उईके यांच्या मृत्युचे प्रकरणी पारशिवनी पोलिसांमार्फत तपास करण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणी आरोपीच्या ड्युटीवर तैनात असलेल्या विशेष व्याघ्र संरक्षण दलातील ३ वननिरीक्षकांना निलंबित करण्यात आले होते.मृत आरोपीच्या कुंटूबियांना वनविभागाकडून कोणतीही मदत देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील गावांची निवड न झाल्याबाबत**

**(३९) १२२२२२ (२३-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण राज्य सन २०१९ पर्यंत पाणी टंचाईमुक्त करण्याचा निर्धार राज्य शासनाने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शेवटच्या टप्प्यात शिल्लक राहिलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील सर्वच १५१ गावांची जलयुक्त शिवारमध्ये निवड करणे आवश्यक असताना जिल्हयातील केवळ ८१ गावाची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे जिल्हयातील उर्वरित ७० गावांना जलयुक्त शिवार योजने पासून वंचित रहावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ऊस्मानाबाद जिल्हयातील उर्वरित ७० गावाची निवड जलयुक्त शिवार योजने साठी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ते (५) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील ७३७ गावांपैकी सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ पर्यंत ५८६ गावांचा समावेश करण्यात आला आहे. उर्वरित १५१ गावापैकी ७८ गावाची निवड सन २०१८-१९ अंतर्गत करण्यात आलेली आहे. तसेच १५१ पैकी उर्वरित ७३ गावामधील ५७ गावांचा समावेश शासन निर्णय दि.१७/१/२०१८ अन्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, (PoCRA) या प्रकल्पामध्ये करण्यात आलेला असून उर्वरित १६ गावांचे पाणलोट क्षेत्र इतर गावांमध्ये समाविष्ठ असल्याने व सदरचे पाणलोट पूर्ण झाल्याने सदर गावांचा समावेश जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मध्ये करण्यात आलेला नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील वनजमिनीवर होत असलेले अतिक्रमण**

**(४०) १२२४५७ (३१-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनजमिनीवर होत असलेले अतिक्रमण हे वन अधिकारी यांच्या संगनमताने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील वन विभागातील अधिका-याची तेथे २२ वर्षे सेवा झाली तरी बदली होत नसल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.वने मंत्री यांनी चौकशीचे आदेश माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनजमिनीवर होत असलेले अतिक्रमण रोखण्यासह सदर अतिक्रमणास जबाबदार असण्या-या संबधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सोयी-सुविधांच्या**
**अभावी पर्यटकांची होणारी गैरसोय**

**(४१) १२२९८४ (३०-०७-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील शौचालय बंद असणे, खेळणी व आसने तुटलेल्या अवस्थेत असणे, बोटींग बंद अवस्थेत असल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राष्ट्रीय उद्यानाची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-११-२०१८) :** (१), (२) व (३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कृष्णगिरी वनपरिक्षेत्रामधील पर्यटकांसाठी अस्तित्वात असलेले स्वच्छालय हे सुस्थितीमध्ये आहे. ते कधीही बंद ठेवण्यात आलेले नाही. स्वच्छालयामध्ये किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती

असल्यास त्याची तातडीने दुरुस्तीचे कामे व नियमीतपणे साफसफाई करण्यात येते. बोटींग साधारणपणे मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये तलावामधील पाणी कमी झाल्याने व पुढे पावसाळयाचा मोसम सुरु होत असल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक वर्षी मे महिन्याचा शेवटचा आठवडा ते ऑक्टोबर महिन्याच्या विजयादशमी पर्यंत बंद ठेवण्यात येते. विजयादशमी नंतर बोटींग सुविधा पर्यटंकांसाठी सुरु करण्यात येते.  तसेच माहे मे सन २०१८ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कृष्णगिरी उपवन वनपरिक्षेत्रातील बालोद्यानातील खेळणी व आसणे पर्यटकांच्या वापरामुळे नादुरुस्त होतात. त्याची वेळीच दुरुस्ती करण्यात येते.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत असलेल्या प्रलंबित कामांबाबत**

**(४२) १२३०९२ (२३-०७-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**(१)** दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता जलयुक्त शिवार योजने अंतर्गत मंजूर कामे कंत्राटदारांनी विहित कालावधीत म्हणजे पावसाळ्यापूर्वी पूर्ण न केल्याने प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे विविध विभागांनी नियोजन पूर्वक विहित कालावधीत पूर्ण केली असती तर तेथील गावांना व शेतक-यांना फायदा झाला आसता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाकरीता किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे**,**

(४) असल्यास, दर्यापूर तालूक्यातील जलयुक्त शिवाराची प्रलंबित कामे पुर्ण करण्यासह सदर कामे प्रलंबित ठेवणा-या अधिका-यावर कारवाई व कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कृषी व पदुम विभाग शासन निर्णय दि.१७/१/२०१८ अन्वये जागतिक बँक सहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, (PoCRA) मध्ये दर्यापूर तालुक्यातील सर्व गावांची निवड करण्यात आलेली असल्याने जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ अंतर्गत या तालुक्यातील एकाही गावाची निवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे प्रस्तावित नसून प्रलंबित सुद्धा नाहीत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील पूल व कोल्हापूरी बंधाराची दुरुस्तीकरीता निधी मंजूर करणेबाबत**

**(४३) १२३४९५ (३१-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील पूल व कोल्हापूरी बंधाराची दुरुस्तीकरीता जलयुक्त शिवार योजनेंतर्गत निधी मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १५ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-याच्या दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कारण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे वरखेड, ता.तिवसा, जि.अमरावती येथील पूल व कोल्हापूरी बंधाराची दुरुस्तीच्या कामाकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत राबवायच्या विविध योजनावरील खर्चाकरिता केलेल्या तरतुदींतर्गत दिनांक ६/६/२०१८ च्या आदेशान्वये रू.२२,६५,००० रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाची ई-निविदा कार्यवाही पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयात वन विभागाने केलेली पशुगणना**

**(४४) १२३५१५ (३१-०७-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात वन विभागाने बुध्द पोर्णिमेच्या रात्री पशुगणना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयात पशूचे प्रमाण जास्त असूनही या पशुगणनेत केवळ ३७६ पशू असल्याची नोंद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) व (२) वन विभागामार्फत वनक्षेत्रात असलेल्या पानस्थळावर वन्यप्राण्यांची प्रगणना बौध्द पोर्णिमेच्यावेळी केली जाते. सन २०१८ मध्ये

दिनांक ३०.०४.२०१८ ते ०१.०५.२०१८ या कालावधीत परभणी जिल्ह्यात असलेल्या वनक्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांची प्रगणना झाली असून त्यामध्ये एकूण ३८९ वन्यप्राणी नोंद झाली आहे. जिल्ह्यामध्ये वनक्षेत्रा व्यतीरीक्त क्षेत्रात सुध्दा वन्यप्राणी आढळून येतात त्यामुळे जिल्ह्यामध्ये फक्त ३७६ वन्यप्राणी असल्याचे निष्कर्ष काढणे संयुक्त होणार नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण केंद्राकडे जाणा-या पुलाची दुरुस्ती करणेबाबत**

**(४५) १२३८५१ (३०-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील वनविभागातील दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण केंद्राकडे जाणारा पूल सन-२०१२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमूळे वाहून गेला आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर पूल वाहून गेल्यामुळे त्याठिकाणी विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना गैरसोयीना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१८) :** (१) दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण संस्था, पाल या प्रशिक्षण संस्थेकडे जाणारा पुल सुकी नदीवर बांधलेला असून, सदर पुल हा सन २०१२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तुटलेला नसून, सन १९९२ मध्ये आलेल्या पुरामुळे तुटलेला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) पाल गांव ते दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण संस्था दरम्यान पुलाची दुरुस्ती / नविन पुल बांधकाम करण्यासाठी उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, रावेर यांना पत्राद्वारे विनंती केलेली असून, अंदाजपत्रकास मंजूरी घेणे व पुल बांधकामासाठी पाठपुरावा चालू आहे.

---

**मेळघाट (ता.चिखलदरा) येथील पशुपालकांवर दंड आकारल्याबाबत**

**(४६) १२३९२६ (३१-०७-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (ता.चिखलदरा) येथील दोन पशुपालक हे अकोट-हरिसाल मार्गाने त्याच्या गावाकडे ५० म्हैशींना घेऊन परत येत असताना त्यांना बेलकुंडजवळ उपवनसंरक्षक आणि वनपाल यांनी २० हजार रुपयांचा दंड आकारल्याची बाब माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तेथे म्हशींना पाणी पाजण्यास देखील मनाई केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पशुपालकांवर दंड आकारणा-या संबधित वन अधिकारी यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गुगामल वन्यजीव विभागात दिनांक २८.०५.२०१८ रोजी श्री. गोंडुजी सोनुजी शेळके, रा.सावऱ्या व श्री. चंद्रभान सुखदेव येवले, रा. सावऱ्या यांनी ८८ गुरांसह चिखलदरा व्याघ्र परिक्षेत्रातील खोंगडा वर्तुळातील धोंद्रीआम नियतक्षेत्र येथील अतिसंवेदनशील क्षेत्रात बिनापरवानगीने प्रवेश केल्याने वन्यजीव सरंक्षण अधिनियम, १९७२ व भारतीय वन अधिनियमातील तरतूदीनुसार वनगुन्हा नोंदवुन आरोपींकडून रु. २०,०६४/- इतकी नुकसान भरपाई वसूल करण्यात आली आहे.

(२) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गुगामल वन्यजीव विभागाअंतर्गत श्री. गोंडुजी सोनुजी शेळके व श्री. चंद्रभान सुखदेव येवले यांनी व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात (अतिसंवेदनशील) क्षेत्रात वन्यप्राणी अधिवासात वन्यप्राण्यांकरीता बांधण्यात आलेल्या पाणवठ्यामध्ये ८८ गुरे घेवून गेले असता त्यांना पाणी पीण्यास मनाई करण्यात आली आहे. तथापि बेलकुंड येथील वन विश्रामगृह येथे उपलब्ध असलेल्या सौरऊर्जा पंपाद्वारे गुरांना पाणी पाजण्याची मुभा देवून सर्व गुरांना पाणी पाजण्यात आले होते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाची सद्यस्थिती

**(४७) १२४०४० (२३-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयासाठी सन २०१७ - २०१८ या वर्षाकरीता जलयुक्त शिवार योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून किती कामे पुर्ण झाली व कामे किती अपुर्ण आहेत,

(३) असल्यास, अपूर्ण कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ मधील ११११ कामे पूर्ण झाली असून ५४५ कामे अपूर्ण आहेत.

(३) व (४) शासन पत्र दि.१०/८/२०१८ अन्वये जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ मधील अूपर्ण कामे पूर्ण करण्यासाठी डिसेंबर, २०१८ अखेर मुदवाढ देण्यात आली आहे. त्यानूसार अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**गोरवाडा (जि.नागपूर) येथील जंगलातील सुरक्षा भिंतीची उंची वाढविण्याबाबत.**

**(४८) १२४४६७ (३०-०७-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरवाडा (जि.नागपूर) येथील जंगलातील नविन बांधलेल्या सुरक्षा भिंतीची उंची ५ ते ६ फुट पर्यंतच असल्यामुळे वन्यप्राणी जंगलाच्या बाहेर पडत असल्याने त्याचा धोका वन्यप्राणी व मानवी वस्त्यांना होत असल्याबाबातची बाब माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जंगलाच्या सुरक्षा भिंतीची उंची कमी असल्यामुळे त्या परीसरातील वन्य प्राण्याची शिकार व इतर असामाजिक कार्य मोठया प्रमाणात वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्यजीव व मानवी वस्तीतील नागरीकांना होणारा धोका लक्षात घेता नवनिर्मित सुरक्षा भिंतीची उंची वाढविण्याकरीता निधीची तरतुद करण्यात येणार आहे काय ,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१), (२) व (३) केंद्रीय चिडियाघर प्राधिकरणाचे मार्गदर्शक तत्वानूसार संरक्षक भिंतीची ऊंची २ मी असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी भिंतीची ऊंची २ मी. आहे. सन २०१२-१३ पर्यत गोरेवाडा प्रकल्पाचे सभोवताल भिंत नव्हती. नव्याने भिंत झाल्यामुळे असामाजिक तत्वांच्या अवैध प्रवेशावर तसेच वन्यप्राण्यांचे वनाबाहेर पडण्यावर नियंत्रण आले आहे. २ मी. ऊंच भितीमुळे बिबट या वन्यप्राण्यांचे जंगलाबाहेर जाणे थांबविणे शक्य नाही. त्यामुळे लाव्हा, दाभा, माहुरझरी या भागात भिंतीलगतचे क्षेत्रात रात्री बिबटांचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि कुठलीही मानव वन्यप्राणी संघर्षाची घटना घडलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वाघ-बिबट्या व सागरी जीवांच्या संरक्षणासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(४९) १२५००७ (३०-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनजीव संरक्षण कायद्याअंतर्गत प्रथम श्रेणीमधील वाघ-बिबट्या सारख्या प्राण्यांच्या सुरक्षेबाबत राज्यात अनेक संवर्धन प्रकल्प सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच श्रेणीमध्ये समावेश असलेल्या सागरी जीवांच्या संरक्षणाबाबत शासनाच्या वन आणि मत्स्य व्यवसाय विभागाने दुर्लक्ष केले असून गेल्या काही वर्षामध्ये या जीवांच्या संरक्षणासाठी संबंधित विभागाकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वाघ-बिबट्या सारख्या प्राण्यांच्या व सागरी जीवांच्या संरक्षणाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वाघ-बिबट्या सारख्या प्राण्यांच्या व सागरी जीवांच्या संरक्षणाकरीता क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरिता अत्याधुनिक साधनसामुग्री जसे बिनतारी संदेश यंत्रणा, कॅमेरा ट्रॅप, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.

• ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे संघर्षाची स्थिती निर्माण होते, त्याठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत व आवश्यक ठिकाणी जलद प्रतिसाद चमु गठीत करण्यात आलेली आहे.

• वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाण्याचे स्त्रोत (पाणवठे, सिमेंट प्लग बंधारे, वनतलाव इ.) निर्माण करण्यात येतात.

• ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून डॉ. शामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंअतर्गत गावातील कुटूंबाना एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.

• महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके, संरक्षण कुटया उभारण्यात आलेले असून वनकर्मचारी रात्र-दिवस गस्त करतात. तसेच श्वानपथक निर्माण करुन त्याचा उपयोग करण्यात येतो.

• वन्यप्राणी शिकार अथवा वनगुन्हयासंबधी माहिती जलद प्राप्त होण्यासाठी वनविभागाची हेल्प लाईन टोल फ्रि क्रमांक १९२६ कार्यान्वित करण्यात आली आहे.

• तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे व सोबतच सागरी वन्यजीवांचे संरक्षण करण्या करीता सन २०१२ मध्ये कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

• कांदळवन कक्षांतर्गत मुंबई, वन मुंबई, ठाणे आणि मिरा भइंदर क्षेत्रातील कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्या करीता सन २०१३ मुंबई कांदळवन संधारण घटकाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

• सिंधुदुर्ग प्रकल्पांतर्गत Olive Redly कासवांच्या संवर्धनासाठी सरकारी कर्मचारी, स्थानिक आणि लोकांच्या मदतीने कार्य केले गेले.

• कांदळवन कक्षाने वेळास आणि आंजर्ले या गावांमध्ये स्थानिक लोकांच्या मदतीने कासवांची व त्यांच्या घरटयांचे संवर्धन करण्यात आले.

• UNDP प्रकल्पांतर्गत समुद्र प्रवाळ, पानमांजर, समुद्री साप, देवमासा, डॉल्फीन तसेच समुद्री कासवे यांचे संवर्धन व संरक्षण करण्याकरीता कार्यक्रम हाती घेतलेले आहेत.

• सागरी जैवविविधता व जीवसृष्टी या संदर्भातील माहिती कंद्र ऐरोली येथे उभारण्यात आलेले आहे. सदर माहिती केंद्राचा माध्यमातुन लोकांना सागरी जीवसृष्टी महत्व व त्याची आवश्यकता याबद्दल माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुंगारेश्वर पर्वतावर लागणा-या वणव्यामुळे तेथील वन्यजीव, वनसंपदेस निर्माण झालेला धोका**

**(५०) १२५५५८ (३०-०७-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळी पर्यटनक्षेत्र आणि महाशिवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध असलेल्या तुंगारेश्वर पर्वतावर लागणा-या वारंवार वणव्यामूळे तेथील वन्यजीव, वनसंपदेस धोका निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार तुंगारेश्वर पर्वतावर लागणारे वणवे आटोक्यात आणण्याबाबत व वन्यजीवांना वाचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१८) :** (१) व (२) तुंगारेश्वर अभयारण्यामध्ये वारंवार लागणाऱ्या वनवणव्यामुळे तेथील वन्यजीव, वनसंपदेस धोका निर्माण झाला असल्याची बाब खरी नाही. तथापि, माहे फेब्रुवारी ते मार्च दरम्यान आगीच्या ३ घटना घडल्या असून त्यामध्य ६.५० क्षेत्र जळीत झाले आहे.

सदरची आग ही जमिनीवरील पालापाचोळा आणि गवत यांना लागत असल्यामुळे झाडापर्यंत पोहचवत नसून त्यामुळे वृक्ष प्रजातीचे नुकसान झालेले नाही.

(३) व (४) आगीच्या नियंत्रण कामी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले आहेत. विविध ठिकाणी आग प्रतिबंधक जाळरेषा आगीचा मोसम सुरु होण्यापूर्वी घेण्यात येतात. वनवणवे आटोक्यात आणण्याकरीता अशासकीय संस्थाचा सहभाग घेण्यात येतो. जवळपासच्या नागरिकांना याबाबत लोकशिक्षण देऊन जनजागृती करण्यात येते.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.